# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक क्र.२३६/२०२३

मा.व्यवस्थापन परिषदेने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रशासकीय कामांमध्ये सुधारणा करण्यासाठी समिती गठित केलेली आहे. सदर समितीचे विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजामध्ये गतीमानता, पारदर्शकता तसेच त्याअनुषंगाने अंमलबजावणीबाबत आणि इतर तद्नुषंगिक बाबी अशाप्रकारच्या प्रशासकीय सुधारणेबाबत कामकाज सुरु आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय विभागांमध्ये विविध कामकाजाच्या अनुषंगाने विविध महाविद्यालये/संस्था यांमधील संस्थाचालक/प्राचार्य, प्राध्यापक व पालक-विद्यार्थी तसेच इतर व्यक्ती यांचा मोठ्या प्रमाणात संपर्क येत असतो. याकरिता समितीने उक्त नमूद संबंधित घटकांकडून प्रशासकीय सुधारणेच्या कामकाजाच्या अनुषंगाने सूचना/माहिती मागविण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

सबब, या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या प्रशासकीय सुधारणा समितीस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संबंधित असलेले विविध महाविद्यालये/संस्था यांमधील संस्थाचालक/प्राचार्य, प्राध्यापक, पालक-विद्यार्थी, विद्यापीठाचे मा.अधिकार मंडळाचे सदस्य, विद्यापीठ सेवक तसेच इतर व्यक्ती यांनी विद्यापीठाच्या प्रशासकीय सुधारणेच्या अनुषंगाने त्यांच्याकडील काही सूचना/माहिती असल्यास विद्यापीठाच्या dy_adminnt@unipune.ac.in या ईमेलवर मंगळवार, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत पाठविण्यात यावेत. जेणेकरुन आवश्यक त्या सूचनांचा समिती अभ्यास करुन त्यांचा उपयोग विद्यापीठाच्या प्रशासकीय सुधारणेसाठी करेल.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जावक क्र.एएन/ 3352 )
दिनांक : 16 OCT 2023 )

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व संचालक, प्रशाला
३. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग
४. मा.संस्थाचालक/प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
५. मा.संस्थाचालक/संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व संस्था

} सदर पत्रातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.